दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगड नगरी
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
• वर्ष १६ वे • अंक ३५२ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शनिवार दि.१९ मार्च २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

बंगालच्या उपसागरात तयार होणारे वादळ महाराष्ट्राकडे घोंगावतंय

नागपूर : वृत्तसंस्था

केवळ विदर्भच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमध्ये नागरिकांना उन्हाचे चटके जाणवू लागले आहेत. बहुतेक शहरांचे तापमान सरासरीपेक्षा अधिक आहे. विदर्भ वगळता उर्वरित महाराष्ट्रात ४१.६ अंश तापमानासह सोलापूर सर्वात उष्ण शहर ठरले तर थंड शहर म्हणून ओळख असलेल्या नाशकातही तापमानाने भरारी घेतली. येथे गुरुवारी ३९.३ अंश तापमान होते.

सध्या सर्वच भागात उष्णतेचा प्रकोप सुरू आहे. मुंबईमध्ये नुकतीच तापमानाने चाळीशी पार केली होती. दोन दिवसांत तापमानात घट झाली असली तरी सरासरीपेक्षा ते ४ अंशाने अधिकच आहे. येथे ३६.९ अंश तापमान नोंदविण्यात आले. इतर शहरांमध्ये नांदेड ४१.२ अंश, बीड ४०.१ अंश, परभणी ४०.९ अंश, मालेगाव ४० अंश, औरंगाबाद ३९.५ अंश व कोल्हापुरात ३९.५ अंश कमाल तापमानाची नोंद झाली. दरम्यान, पुढच्या दोन दिवसांत तापमानात घसरण होण्याचा अंदाज आहे. बंगालच्या उपसागरात तयार होणारे वादळ महाराष्ट्राकडे घोंगावत असून, त्याच्या प्रभावाने विदर्भासह राज्यातील काही भागात ढगाळ वातावरण राहील. कोकणमध्येही हलका पाऊस होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.

पनवेल येथे प्राथमिक शिक्षक संघाची शिक्षण परिषद संपन्न

प्राथमिक शाळा शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांसाठी विशेष बैठक आयोजित करणार : शरद पवार

दै.रायगड नगरी । पनवेल

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे वतीने शिक्षण परिषद व भव्य वार्षिक अधिवेशन पनवेलच्या कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी येथे आयोजित करण्यात आले होते. राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा माजी केंद्रीय मंत्री खासदार शरद पवार या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपस्थित होते.१७ व १८ मार्च रोजी संपन्न झालेल्या शिक्षण परिषदेस जलसंपदा मंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील, ग्राम विकास मंत्री हसन मुश्रीफ प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कोकण शिक्षक मतदार संघाचे महाराष्ट्राच्या विधान परिषदेत प्रतिनिधित्व करणारे आमदार बाळाराम पाटील हे या सोहळ्याचे स्वागताध्यक्ष होते.

स्वागताध्यक्ष आमदार बाळाराम पाटील यांनी प्रास्ताविक सादर केले. प्राथमिक शिक्षक संघाचे आणि रायगड जिल्ह्याचे नाते फार जुने आहे असे ते म्हणाले. आज जरी शिक्षकांना सहा आकडी पगार असले, तरी त्यांच्या इतर प्रलंबित समस्यांकडे आपल्याला लक्ष द्यावं लागेल. मागच्या आठवड्यात सादर झालेल्या अर्थसंकल्पात त्यांच्यासाठी फार काही तरतूद आढळून येत नाही.९० हजार शिक्षकांच्या वेतनात त्रुटी आहेत, तर ४५ हजार फक्त २० टक्के पगारावर काम करत आहेत. पती-पत्नी शिक्षक असणाऱ्यांच्या बदल्या तीस किलोमीटर वर्तुळात व्हाव्यात अशी अपेक्षा असते परंतु वास्तवात तसे होत नाही. छत्तीसगड आणि राजस्थान या राज्यांमध्ये ज्याप्रकारे निवृत्तिवेतन आहे त्याच स्वरूपाचे निवृत्तिवेतन आपल्या राज्यात देखील सुरू व्हावे. सातव्या वेतन आयोगातील त्रुटी दूर व्हाव्यात. जिल्हा परिषद शाळांतील सर्व विद्यार्थ्यांना गणवेश मिळावा या आमच्या शासन दरबारी मागण्या आहेत.. असे आमदार बाळाराम पाटील प्रास्ताविकात म्हणाले.

> महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ ही सगळ्यात जुनी संघटना आहे. गेली दोन वर्षे कोरोनाविषाणू चा प्रभाव असल्यामुळे अधिवेशन होऊ शकले नाही याची खंत आहे. जुनी पेन्शन योजना लागू होणे यासह अन्य प्रलंबित मागण्या करिता अधिवेशनाची सांगता झाल्यानंतर विशेष बैठकीचे आयोजन करून त्यात संबंधित खात्याच्या मंत्र्यांना पाचारण करणार.
>
> **- शरद पवार**

आमदार बाळाराम पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकातून कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी च्या मुहूर्तमेढीचे आणि शरद पवार यांचे एक अनोखे नाते असल्याचे सांगितले. त्यांचे वडील माजी आमदार दत्तूशेठ पाटील यांच्या ७० व्या वाढदिवसाच्या निमित्ताने कार्यकर्त्यांनी लोकवर्गणीतून ७० लाखांची थैली देण्याचा कार्यक्रम आयोजित केला होता. त्या कार्यक्रमात शरद पवार अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. कार्यकर्त्यांच्या प्रेमापोटी एक करोड पेक्षा जास्त थैली जमली. माजी आमदार दत्तूशेठ पाटील यांनी ती तशीच्या तशी आमदार विवेक पाटील यांना सुपूर्द केली व गोरगरिबांच्या मुलांसाठी प्रकल्पग्रस्तांच्या मुलांसाठी भव्यदिव्य अशी स्पोर्ट्स अकॅडमी बांधावी अशी इच्छा प्रकट केली. तात्यांचे स्वप्न विवेक पाटील यांनी पूर्ण केले. आणि त्याच कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी मध्ये आज शिक्षण परिषदेत शरद पवार यांनीपुन्हा उपस्थित राहणे हे आमच्यासाठी सौभाग्याचे आहे असे आमदार बाळाराम पाटील म्हणाले.

यानंतर शिक्षकांचे लाडके तात्या अर्थातच संभाजीराव थोरात, रायगडच्या पालकमंत्री आदिती ताई तटकरे, ग्राम विकास मंत्री हसन मुश्रीफ, आमदार निलेश लंके यांची भाषणे झाली. या कार्यक्रमाला यावेळी शिक्षक नेते संभाजीराव थोरात, राज्य अध्यक्ष अंबादास वाजे, सरचिटणीस बाबासाहेब जगताप, राज्य प्रतिनिधी अविनाश म्हात्रे, म. ज.मोरे, रायगड जिल्हा अध्यक्ष बाबुराव पालकर, सरचिटणीस बाबासाहेब जगताप, बाळासाहेब झावरे, पोपटराव सूर्यवंशी, मच्छिंद्रनाथ मोरे, संघाच्या महिला आघाडी राज्य प्रमुख डॉक्टर स्वाती शिंदे, बाळकृष्ण तांबारे, एन वाय पाटील, मधुकर साटोळे,संजय फुंडे आदी मान्यवर यांच्यासह राज्यभरातून आलेले शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्यभरातील दीड लाख सदस्य संख्या असलेली ही संघटना अत्यंत प्रामाणिकपणे काम करत आहे. संघटनेचे आणि शरद पवार यांचे असलेले ऋणानुबंध लक्षात घेता शरद पवारांनी व्यस्त शेड्युलमध्ये देखील संघटनेला आजच्या कार्यक्रमाची वेळ दिली. धुळवडी सारखा सण असून देखील संघटनेतील हजारो सदस्य शिक्षण परिषदेस उपस्थित राहिले. कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी येथे भव्य दिव्य अशा शामियान्यात २५ हजार शिक्षकांची बैठक व्यवस्था करण्यात आली होती.

कर्जत मध्ये बच्चे कंपनीची धुळवड जोरात साजरी

दै.रायगड नगरी । कर्जत

कर्जत तालुक्यात पारंपारिक पध्दतीने होळीचा सण साजरा केला जातो, होळी आणि धुलवड हे दोन दिवस हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करुन विविध रंगाची उधळण करुन धुलवड साजरी केली जाते. परंतु दोन वर्षांपासून जगावर, देशावर कोरोना महामारीचे सावट पसरले होते याचे भान ठेवून शासनाने काही नियम ठरवून दोन वर्षे धुलवड साजरी करण्यात आली होती, मात्र यावर्षी कोरोना महामारीचे सावट कमी असल्याने शासनाने नियम शिथिल केले आहेत त्यामुळे बच्चे कंपनींनी मोठ्या प्रमाणात धुलवड साजरी करून विविध रंगाची उधळण केली.

लहान मुलांना होळीचे वेध अगोदर पासुन लागले असतात बाजारात विक्री साठी आलेल्या विविध प्रकारच्या पिचका-या खरेदीसाठी लहान मुलांचा हट्ट असतो. होळी झाली की दुस-या दिवशी धुलवड साजरी केली जाते,

या दिवसाची मुलांसह मोठी माणसेही वाट बघत असतात, आदल्या दिवशी होळीचे किती जागरण झाले तरी लहान मुले सकाळी लवकर उठुन हातात पिचकारी घेऊन धुलवड साजरी करायला बाहेर पडतात, आपल्या हातातील पिचकारीने दुस-याच्या अंगावर रंग उडवत आनंद साजरा करत असतात आणि मग या मध्ये मोठी माणसे, महिला एकमेकांना विविध रंगानी रंगवुन, भिजवून धुलवड साजरी करतात. बच्चे कंपनीं सह मोठ्यांनी एकमेकांच्या चेह-यावर सुके रंग लावून पाण्याचा वापर करून मोठ्या प्रमाणात धुलवड साजरी केली.

पडघे गावात विविध विकासकामांचे उदघाटन

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल महानगरपालिका प्रभाग क्र.१ मधील नगरसेवक विष्णू जोशी व प्रभाग क्र.१ मधील नगरसेवकांच्या सातत्याच्या पाठपुराव्यामुळे पडघे गावात विविध विकासकामे होत आहे. या विकास कामांचा उद्घाटन व लोकार्पण सोहळा पार पडला.

पडघे हनुमान मंदिर ते एमआयडीसी पर्यंतच्या काँक्रीट रस्त्याचे लोकार्पण, राधा कृष्णा मंदिर ते सिडको नाल्यापर्यंत बांधण्यात येणाऱ्या गटाराचे भूमिपूजन, नगरसेवक विष्णू जोशी यांच्या नगरसेवक निधीतून लावलेल्या पेव्हर ब्लॉकचे लोकार्पण, पडघे पाण्याच्या टाकीचे लोकार्पण, नगरसेवक अरविंद म्हात्रे यांच्या नगरसेवक निधीतून शाळेसमोर बसविण्यात येणाऱ्या पेव्हर ब्लॉकच्या कामाचे उदघाटन, बौद्ध समाज मंदिराचे भूमिपूजन, नगरसेवक विष्णू जोशी यांच्या नगरसेवक निधीतून पडघे गावात ठीकठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे कामाचे उदघाटन या विविध विकासकामांचे लोकार्पण व उदघाटन पार पडले. यावेळी सोहळ्याला आमदार बाळाराम पाटील, पनवेल पं.स माजी सभापती काशिनाथ पाटील, विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे, जिल्हा चिटणीस गणेश कडू, नगरसेवक विष्णू जोशी, युवा नेते किरण दाभणे, पांडूशेठ भोईर-उद्योगपती, अनंताशेठ भोईर-मा. सरपंच पडघे, सूर्यकांत जोशी-उद्योगपती, वसंतशेठ भोईर-मा. उपसरपंच पडघे, गणपतशेठ जोशी-मा.सरपंच पडघे, नाथा पाटील-वारकरी सांप्रदाय, सुरेशशेठ भोईर-मा.सरपंच पडघे, हिरामण भोईर-शिवसेना प्रमुख पडघे, प्रभाकर पाटील-समाज कार्यकर्ता, चंद्रकांत भोईर-समाज कार्यकर्ता,

◄ .../२

सौ. तनया अनिकेत सावळेकर यांना डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी पदवी प्रदान

दै.रायगड नगरी । पनवेल

भारतातील मानहानी आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे कायदे यावर डॉ. सौ. तनया अनिकेत सावळेकर यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात प्रबंध सादर केला असून नुकतीच त्यांना डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (Ph.D.) प्रदान करण्यात आली.

डॉ. तनया सावळेकर यांनी राष्ट्रीय विधी विद्यापीठ, मुंबई चे कुलगुरू डॉ. दिलीप उके यांच्या मार्गदर्शनाखाली पी.एच .डी पूर्ण केली. डॉ . सौ. तनया अनिकेत सावळेकर यांनी सन २०१७ मध्ये त्यांचे पदव्युत्तर शिक्षण (LL.M.) पूर्ण केले आहे.त्यांचे स्पेशलायझेशन 'फौजदारी कायदे' आहे. २०१५ मध्ये माहिती आणि तंत्रज्ञान कायद्या अंतर्गत सायबर मानहानी

चे कलम ६६-अ घटनाबाह्य घोषित करून रद्द करण्यात आले. त्यावर त्यांनी त्यांच्या शिक्षणादरम्यान निरीक्षण केले होते की यामुळे सोशल मीडियावरील भाषण स्वातंत्र्याचे नियमन करण्यासाठी कोणतेही कायदे नाहीत व या कमतरतेमुळे अनेक समस्या उद्भवू शकतात. सोशल मीडियाचा प्रचार लक्षात घेता या माध्यमावरील भाषण स्वातंत्र्यावर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे, याचे महत्त्व त्यांना कळाले. २०१६ मध्ये भारतीय दंड संहितेच्या कलम ४९९, ला घटनात्मकदृष्ट्या वैध घोषित करण्यात आले. कलम ४९९ मध्ये मानहानीसाठी फौजदारी शिक्षेची तरतूद आहे.एकीकडे न्यायव्यवस्थेने भारतीय दंड संहितेतील मानहानीचे कायदे कायम ठेवले तर दुसरीकडे सायबर जगातील मानहानी चे कायदे घटनाबाह्य ठरवले. यामुळे लोक त्यांच्या स्वातंत्र्याचा गैरवापर करू शकतात.

◄ .../२

२४ जूनला एक लाख प्रकल्पग्रस्त रस्त्यावर उतरणार

आंदोलनातून प्रकल्पग्रस्तांच्या पदरात यश; स्थानिकांचा विचार करीत नसतील तर सिडको समुद्रात बुडवायला लागेल : रामशेठ ठाकूर

दै.रायगड नगरी । पनवेल

येत्या २४ जूनला एक लाख प्रकल्पग्रस्त रस्त्यावर उतरणार आहेत, त्यामुळे सिडको आणि राज्य सरकारच्या विरोधात काही तरी भयंकर घडणार आहे, अशी भविष्यवाणी करत 'भूतो न भविष्यतो' आंदोलनाचा गर्भित इशारा काळा दिन आंदोलनातून सिडको आणि राज्य सरकारला देण्यात आला, आणि तशी घोषणा लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीचे अध्यक्ष दशरथदादा पाटील यांनी यावेळी केली. तसेच यावेळी रखरखत्या उन्हात सिडकोच्या नावाने शिमगा करण्यात आला. येत्या काळात सिडको आणि राज्य सरकारच्या उरात धडकी भरवणारे निर्णय घेण्यात येतील असे या आंदोलनातून अधोरेखित करण्यात आले.

लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीचे अध्यक्ष दशरथदादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात समितीचे उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, सरचिटणीस कॉम्रेड भूषण पाटील, भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष जयंत पगडे, अतुल पाटील, २७ गाव संघर्ष समितीचे अध्यक्ष नंदराज मुंगाजी, खजिनदार जे. डी. तांडेल, दशरथ भगत, राजेश गायकर, भाजपचे उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर, शहराध्यक्ष कौशिक शहा, कामगार नेते सुरेश पाटील, अरुण जगे, महापालिका स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, नगरसेविका हेमलता म्हात्रे, जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, नगरसेवक अभिमन्यू पाटील, अमर पाटील, प्रवीण पाटील, युवा नेते दशरथ म्हात्रे, न्हावा ग्रामपंचायतीचे सरपंच हरेश्वर म्हात्रे, गव्हाण उपसरपंच विजय घरत, वहाळ उपसरपंच अमर म्हात्रे, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, कमगारनेते सुधीर घरत, सुनील घरत, यांच्यासह प्रकल्पग्रस्त मोठ्या संख्येने सामील झाले होते.

लोकनेते दि. बा. पाटील यांच्या जासई जन्मगावी त्यांच्या स्मृतींना अभिवादन करून १७ मार्च या सिडकोच्या वर्धापन दिनी पनवेल, उरण व बेलापूर पट्ट्यातील ९५ गावातील सिडको पीडित प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांनी लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समिती व इतर प्रकल्प समितीच्यावतीने दास्तान फाटा येथे काळा दिन आणि रास्ता रोको आंदोलन केले. यावेळी या क्रांतिभूमीतून दिबांच्या पुण्यतिथी दिनी म्हणजेच २४ जूनचा एल्गार जाहीर करतानाच आजपासून त्याची तयारी आणि नियोजन सुरु असल्याचे अधोरेखित केले.

१८ एप्रिल २०२१ रोजी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळा बाबत सिडको संचालक मंडळाने केलेला ठराव विखंडित करून लोकनेते दि बा पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ असा ठराव मंजूर करण्यात यावा, जेएनपीटी प्रकल्पग्रस्तांना विनविलंब १२.५% भूखंड वाटप करण्यात यावे, दिनांक २५ फेब्रुवारी २०२२ रोजी गरजेपोटी बांधकामांच्या बाबतीत प्रसिद्ध झालेल्या शासन निर्णयाबाबत प्रकल्पग्रस्तांना विश्वासात घेऊन योग्य ते बदल करण्यात यावेत तसेच नवीमुंबई प्रकल्पग्रस्तांच्या सर्व प्रलंबित मागण्या बैठका घेऊन सोडविण्यात याव्यात, या मागण्यांसाठी गुरुवारी जोरदार रास्ता रोको करण्यात आला. आंदोलन तीव्र होऊ नये यासाठी पोलिसांनी समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, कॉम्रेड भूषण पाटील, २७ गाव संघर्ष समितीचे अध्यक्ष नंदराज मुंगाजी, दशरथ भगत तसेच महिला आंदोलकांना ताब्यात घेतले व त्यानंतर त्यांची सुटका करण्यात आली.

आंतराष्ट्रीय विमानतळ झाले पाहिजे याबद्दल दुमत नाही पण त्या विमानतळाला दिबांचे नाव लागलेच पाहिजे हे अंतिम सत्य आहे. अन्यथा फार मोठी क्रांती घडेल आणि त्याशिवाय पर्याय राहणार नाही. या भागातील तसेच नवी मुंबईतील काही भागातील प्रकल्पग्रस्तांना प्लॉट दिले गेले नाहीत. नगरविकास खात्याकडून काही प्लॉट विकले गेले आहे असे समजते आणि

◄ .../२

पेणमध्ये प्लास्टिक पिशव्या कायम, बंदी हद्दपार

दै.रायगड नगरी । पेण

गाजावाजा करत सुरू करण्यात आलेल्या प्लास्टिक बंदीचा पुरता फज्जा उडाला आहे. सद्य:स्थितीत पन्नास मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिकच्या पिशव्या कायम असून बंदी अक्षरश: हद्दपार झाल्याचे दिसून येत आहे.

शहरातून प्लास्टिक हद्दपार करण्यासाठी प्रयत्न केले जात नाहीत. परिणामी, प्लास्टिक पिशव्यांच्या विक्रीचे तसेच कचऱ्यात साचणाऱ्या प्लास्टिकचे प्रमाण वाढले आहे. नाले, गटारे तसेच सार्वजनिक ठिकाणी इतर कचऱ्याबरोबर प्लास्टिक पिशव्यांचा खच पडत आहे. पेण शहरातून दररोज १५ टनांपेक्षा जास्त घर-गुती कचरा संकलित केला जातो. या कचऱ्यात मोठ्या प्रमाणावर प्लास्टिकचे प्रमाण असल्याचे दिसून येत आहे. बाजारपेठेतील दुकानदार तसेच किरकोळ विक्रेत्यांकडून पन्नास मायक्रोनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांची सर्रास विक्री व वापर केला जात आहे. संबंधित दुकानदार तसेच विक्रेत्यांवर नियमित कारवाई होत नसल्याने प्लास्टिक वापर व विक्रीच्या प्रमाणात वाढ झाली आहे. शहरात शंभर हुन अधिक हॉटेल्स, चायनीज, वडापाव विक्रेते तसेच कापड दुकानदार आहेत त्यांच्याकडूनही मोठ्या प्रमाणात प्लास्टिक पिशव्यांचा वापर केला जात आहे.

कृषी उत्पन्न बाजार समिती ची भाजीमंडई, बस स्टँड समोरील भाजी मार्केट,अंतोरे रोड, बाजारपेठ,नगरपालिका परिसर, मोरेश्वर टॉकीज, मच्छीमार्केट,राजू पोटे मार्ग, याठिकाणी प्लास्टिक कचरा साचत असल्याचे दिसून येत आहे. प्लास्टिक हा असा पदार्थ आहे की, तो पुरला तरी तो नष्ट होऊ शकत नाही. जाळला तर हवेचे प्रदूषण होते.त्यातून गंभीर आजारही होण्याची भीती असते. तसेच तो साठवून ठेवला तर त्यापासून दुर्गंधी व इतर आजारही होऊ शकतात. पेण शहरातून दररोज सुमारे १५ टन कचरा संकलित केला जातो. या संकलित कचऱ्यात ६ ते ७ टन सुका कचरा असतो. या सुक्या कचऱ्यात दररोज सरासरी २५ ते ३० किलो प्लास्टिक असते, असे स्वच्छता कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. प्लास्टिकच्या वापरामुळे पर्यावरणावर गंभीर दुष्परिणाम होत आहेत.प्लास्टिक पिशव्यांची पहिली समस्या म्हणजे या पिशव्यांचे विघटन होत नाही.

पिशवीचे पूर्णपणे विघटन होण्यासाठी चारशे ते पाचशे वर्षांचा कालावधी लागतो. आज आपण पिशवी वापरून टाकून दिली तर पुढच्या चार ते पाच पिढ्यांना त्याचा त्रास होऊ शकतो.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे : नेरेपाडा, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ही मिळकती जमीन मालक १) श्री.रमन सदाशिव खुटले २) श्री.तुकाराम गणपत कदम यांजकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. मौजे : नेरेपाडा, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील मिळकत.

अ.क्र.	सर्व्हे/गट क्र.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पै.
१	१३२	५	०-२२-८० पो.ख.०-०१-५० एकूण ०-२४-३०	२.३१

तरी वरील मिळकतीचे बाबतीत कोणाही व्यक्तीचा अथवा व्यक्तीचा अथवा संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, बक्षिस, साठेकरार, फरोक्त, लीज, ताबा, भाडेपट्टा, कुळ, अन्नवस्त्र, पोटगी, इजमेंट, अतिक्रमण वगैरे इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध अगर बोझा असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत खालील सही करणार खरेदीदाराचे वकील यांच्याकडे आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करण्याची कार्यवाही चालू करतील व आणि मागाहून येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १९/०३/२०२२

सही/-
ॲड.शैलेश रामलाल ओसवाल
१०१, पहिला मजला, विरुपाक्ष प्लाझा,
विरुपाक्ष मंदिराजवळ, पनवेल,
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड

जाहीर नोटीस

मौजे : बेलोंडाखार, ता.उरण, जि.रायगड येथे आमचे अशिलांनी वडिलोपार्जित मालकीची खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत आहे. ती खालीलप्रमाणे :-

मिळकतीचे वर्णन
मौजे : बेलोंडाखार, ता.उरण, जि.रायगड

सर्व्हे नं.	हि.नं.	क्षेत्र	आकार	भोगवटा धारकाचे नाव व पत्ता
५१	६	४७.७० पैकी १८ गुंठे खरेदी	६.७५	कुंदा जनार्दन ठाकूर

सदर मिळकत ही आमचे वडिलोपार्जित मालकीची असून सदर मिळकतीमध्ये अन्य कोणचाही ताबा, कब्जा, वहिवाट, कुळहक्क वगैरे नाही. तसेच सदर मिळकत ही अन्य कोणासही, साठेकरार, गहाणखत अगर खरेदीखत असा कराराने दिलेली नाही. सबब नोटीशीद्वारे सदर मिळकतीत कोणाचे काही हक्क हितसंबंध असल्यास कागदोपत्री पुराव्यासह ७ दिवसांचे आत हरकत घ्यावी. सदर मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकती संबंधी इतर कोणाचेही हक्क व हितसंबंध नाही असे समजून व्यवहार पूर्ण करतील, तरी सदर मिळकतीची पेपर नोटीस देणेस माझी कोणतीही हरकत नाही.

पनवेल
दि.१८/०३/२०२२

सही/-
ॲड.रेणुका मिन्नाथ पाटील
ऑफिस नं.८, यशोकिरण सोसायटी,
सावरकर चौक, लोखंडीपाडा, पनवेल
दूरध्वनी क्र. ९६१९०३८५१५

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.सोपान नारायण नाईक यांनी खालील वर्णनाची मिळकत / भूखंड क्षेत्रापैकी १०० चौ.मी. क्षेत्र आमचे अशिलांचा भाऊ श्री.मुकेश नारायण नाईक यांना बक्षिस पत्राद्वारे द्यावयाचे ठरविलेले आहे. सदर मिळकती / भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे :-

मिळकतीचे वर्णन
नोड : पुष्पक / वडघर, ता.पनवेल, जि.रायगड

युनिट के.क्र.	सर्व्हेक्षणा नुसार बांधकाम क्र.	नोड	सेक्टर क्र.	भूखंड क्र.	क्षेत्र चौ.मी.
KOL-ICOGD-150 N	KL-41	पुष्पक/ वडघर	आर-१	६	१६० चौ.मी. क्षेत्रापैकी १०० चौ.मी. क्षेत्राचे बक्षिसपत्र

तरी सदरचे मिळकती / भूखंडावर कोणतीही व्यक्ती / राज्य शसकीय विभाग / संस्था / कामगार / मजूर / बँक / प्रायव्हेट फर्म यांचा कोणत्याही प्रकारचा हक्क, दावा, थकबाकी अथवा अधिकार हे वारसहक्क, गहाणखत, दानपत्र / बक्षिसपत्र, खरेदीखत, भाडेपट्टा, भाडेकरार (लिव्ह ॲण्ड लायसन्स ॲग्रीमेंट) याद्वारे असल्यास किंवा कोणतीही कोर्ट केस अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, दावा, थकबाकी अथवा अधिकार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ (पंधरा) दिवसांचे आत सर्व लेखी कागदोपत्री पुराव्यासहीत खालील नमूद केलेल्या वकीलांकडे कळवावे अन्यथा तसा हक्क हितसंबंध नाही असे समजून बक्षिसपत्राचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सही/-
ॲड.कैलास नारायण घरत
००२, प्राईड सी.एच.एस.लि.,
सेक्टर-११, भूखंड क्र.०५, माथेरान रोड,
नवीन पनवेल, जि.रायगड-४१०२०६

मा.श्री.सोनावणे सो
प्रोसेस जमा. रु.१००
वकील : रितेश सोनटक्के

जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर पनवेल यांच्या न्यायालयात
दि.चौ.अर्ज नं.२९४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२६/०४/२०२२

१) श्रीमती.ओमकांती अशोककुमार अग्नीहोत्री
रा.११३/९०, स्वरुप नगर, कानपूर,
कानपूर नगर, उत्तरप्रदेश-२०८००२ अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मयत कै. अशोक कुमार अग्नीहोत्री रा.११३/९०, स्वरुप नगर, कानपूर, कानपूर नगर, उत्तरप्रदेश-२०८००२ यांचे दि.२३/०२/२०१८ रोजी कानपूर, उत्तरप्रदेश येथे निधन झाले. सदर मयताचे नावे असलेली मिळकत खालीलप्रमाणे :-

मिळकतीचे वर्णन
फ्लॅट नं.१०१, पहिला मजला, बिल्डींग नं.१,
बालसाम, एनकी गार्डन फेज-१, वावंजे गाव,
ता.पनवेल, जि.रायगड
(अंदाजे किंमत रु.१०,०३,६००/-)
(रक्कम रुपये दहा लाख तीन हजार सहाशे मात्र)

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदारांनी वारसदाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारसदाखल्याबाबत कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या नययालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न घेतल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणर नाही.

आज दि.१७/०३/२०२२ रोजी माझ्या सहीने दिले.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

पृष्ठ क्र.१ वरुन...

पडघे गावात विविध विकासकामांचे उद्घाटन

अशोक भोईर-मा.सरपंच पडघे, शंकरशेठ जोशी-समाज कार्यकर्ता, जगदीश जोशी-मा.सदस्य पडघे, सचिन पाटील-युवा कार्यकर्ता, बबन भोईर-युवा कार्यकर्ता, मिन्नाथ जोशी-युवा कार्यकर्ता, नकुल जोशी-मा.सरपंच पडघे, राहुल भोईर-युवा कार्यकर्ता, अमित कांबळे-युवा कार्यकर्ता, राहुल कांबळे-युवा कार्यकर्ता तसेच शेकाप पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

आंदोलनातून प्रकल्पग्रस्तांच्या पदरात यश

त्याचाही अभ्यास सुरु आहे. ४० वर्षे होऊन सिडको प्रश्न मार्गी लावत नाही त्यामुळे सातत्याने आपल्याला आंदोलने करावे लागतात. दिबा पाटील आमच्या जीवनातील आदर्श आहेत. त्यांच्या आशीर्वादाने आंदोलनाची यशस्वी वाटचाल होत असून हा लढा सर्व मागण्या पूर्ण होईपर्यंत थांबणार नाही. येत्या २४ जूनला किमान ०१ लाख लोकांचा जनसमुदाय रस्त्यावर उतरणार असून त्याच्या तयारीला सुरुवात झाली अशी. सर्वनिशी तयारी करून आता उतरायचे आहे. पालघर मधील मंडळी १५ ते २० हजार लोकांचा ताफा घेऊन गुजरात महामार्ग, भिवंडीवाले २० हजार लोकं नाशिक महामार्ग, ठाणे, कल्याण, डोंबिवलीवाले त्यांच्या भागातील रस्ते त्याचबरोबर रायगड नवी मुंबई वाले पुणे तसेच गोवा महामार्ग बंद करण्याचा मानस करून आहेत. तशी चर्चा झाली आहे पण अंतिम नियोजन येत्या कालावधीत होईल. केवळ आश्वासन नको एक महिन्याच्या आत जेएनपीटी साडेबारा टक्के कार्यवाही सुरु झाली पाहिजे अन्यथा पुन्हा या मागणीसाठी आंदोलन केल्याशिवाय राहणार नाही. जो पर्यंत सर्व मागण्या प्रकल्पग्रस्तांच्या पदरात पडत नाही तो पर्यंत लढा सुरूच राहणार आहे, २४ जूनला किमान ११ जिल्ह्यात आंदोलन होईल आणि त्या तयारीला वेग येईल.

दिबा पाटील साहेबांचे नाव विमानतळाला मिळालेच पाहिजे हे आपले धेय्य ठरलेले आहे. आणि सिडको प्रकल्पग्रस्तांच्या बाबतीत जो अन्याय करतोय तो दूर करण्यासाठी आणि प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी लढा उभारलेला आहे. संघर्ष करून लोकांना त्रास देण्याचा आमचा धंदा नाही आणि ते काम आम्ही करणार नाही फक्त प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या पूर्ण झाल्या पाहिजेत याच आमच्या रास्त अपेक्षा आहेत. सिडको जर चांगले नियोजन करत असेल तर ठीक आहे पण हे करताना स्थानिकांचा विचार करीत नसतील तर सिडको काहीही उपयोगाची नाही ती सिडको समुद्रात बुडवायला लागेल आणि एक दिवस तो हि येईल. पण सिडकोला पण आता समजतंय आपण यांना त्रास दिला तर हि लोक आपल्याला इथे ठेवणार नाहीत. आणि तशा दृष्टीने ते चर्चेला येतात. मागच्या आंदोलनामुळे एक एक यश प्रकल्पग्रस्तांच्या पदरात पडत आहे. सिडको सरकारशी बोला जेएनपीटी साडेबारा टक्के भूखंड प्रश्न मार्गी लावा तरच हे १७ मार्चचे आंदोलन उग्र होणार नाही असे आमच्याशी चर्चा करायला आलेल्या पोलीस अधिकाऱ्यांना आम्ही सांगितले आणि तसे त्यांनी सिडकोला शासनाला कळविले असेल त्यामुळे सिडकोने आता ऑर्डर दिली आणि हा प्रश्न मार्गस्थ लागला आणि ते दिबासाहेबांच्या आशीर्वादामुळे आणि आंदोलनामुळेच शक्य झाले आहे.

१७ मार्च सिडकोचा स्थापना दिवस. सिडकोच्या दृष्टिकोनातून कदाचित तो अभिमानास्पद दिवस असेल पण या दिवशी प्रकल्पग्रस्तांना संघर्ष करावा लागत आहे. त्यामुळे लोकनेते दि बा पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय समितीने निर्णय घेतला कि, लोकनेते दि. बा. पाटील साहेबांचे नाव विमानतळाला मिळाले पाहिजे आणि प्रकल्पग्रस्तांचे जे काही प्रलंबित प्रश्न आहेत. ते सोडविण्याच्या दृष्टिकोनातून क्रांतिभूमी दास्तान फाटा येथे रास्ता रोको करायचे आणि अनुषंगाने आज आंदोलन पुकारले असून जो पर्यंत सर्व मागण्या पूर्ण होत नाही तो पर्यंत कितीही काळ लागो लढा यशस्वी थांबायचे नाही.

सौ. तनया अनिकेत सावळेकर यांना डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी पदवी प्रदान

डॉ. तनया सावळेकर यांनी याचा अभ्यास केला आणि भारतीय दंड संहितेच्या कलम ४९९ मध्ये सायबर मानहानीच्या कायद्याचे देखील समाविष्ट करण्याचे सुचवले. त्यांनी त्यांच्या अभ्यासात मानहानीच्या सर्व संबंधित प्रकारांचा अभ्यास केला आहे. त्याचप्रमाणे त्यांनी भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम १२४-क, प्रजाक्षोभन चा देखील अभ्यास केला व आपल्या प्रबंधात त्यातही काही बदल सुचवले आहेत. डॉ. तनया सावळेकर यांनी आपले ध्येय नेहमीच उच्च ठेवले आहे.पदव्युत्तर शिक्षण संपताच त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात कार्य सुरू केले, त्या गेल्या ५ वर्षांपासून शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असून त्यांनी बी. सी. टी. कॉलेज ऑफ लॉ, पनवेल, डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ लॉ, नेरुळ यांसारख्या नामांकित कॉलेज मध्ये व्हिजिटिंग प्रोफेसर म्हणून शिकविले आहे. डॉ. तनया सावळेकर यांनी सन २०१८ मध्ये पहिल्याच प्रयत्नात नेट परीक्षा उत्तीर्ण केली असून सध्या के. एल. ई. कॉलेज ऑफ लॉ, कलंबोली, नवी मुंबई येथे सहायक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्या येथे मास्टर् ऑफ लॉ च्या विभाग प्रमुख आहेत. डॉ. तनया सावळेकर या वास्तुविशारद अनिकेत सावळेकर यांच्या पत्नी असून माजी नगरसेवक अरविंद सावळेकर यांची स्नुषा आहे, त्यांना त्यांच्या यशात त्यांच्या पतीचा तसेच सावळेकर व कमलाकर कुटुंबियांचा पाठिंबा मिळाला आहे. त्यांनी त्यांची डॉक्टरेट त्यांचे वडील स्वर्गीय श्री. प्रमोद कमलाकर यांना समर्पित केली असल्याचे सांगितले आहे. त्यांना सामाजिक कार्यात रस असून त्यांच्या अभ्यासावर पुस्तक प्रकाशित करण्याची त्यांची इच्छा आहे. त्यांच्या यशाबद्दल सर्व थरातून त्यांचे कौतुक होत असून अनेक मान्यवरानी त्यांना त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

महाराष्ट्र शासन

जाहीर निविदा

ठेकेदारकडून मजूर पुरवठा
माहे ०१ मार्च २०२२ ते ३१ मार्च २०३३

याद्वारे कळविण्यात येते की, कृषी अधिकारी कृषी चिकित्सालय फळरोपवाटीका खोपोली तालुका : खालापूर, जिल्हा : रायगड येथील प्रक्षेत्रावर विविध प्रकारची कामे करण्यासाठी उदा.रोपासाठी पिशव्या भरणे, बियाणे पेरणे रोपांना पाणी देणे खड्डे खोदानेपानी देणे औषध फवारणे ए. विविध प्रकारची कामे करण्यासाठी निविदा दिनांक २८/०३/२०२२ रोजी पर्यंत मागविण्यात येत आहेत. उशिरा येणाऱ्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

संबंधित बाबीविषयी सविस्तर माहिती व अटी व शर्ती संबंधित रोपवाटीका कार्यालयात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. निविदा उघडण्याची तारीख २९/०३/२०२२ सायंकाळी ४.०० वाजता राहील. निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार खालील सही करणाऱ्याचा राहील.

सही/-
कृषी अधिकारी
कृषी चिकित्सालय फळरोपवाटीका
खोपोली, जि.रायगड

क्र.जिमाका/रायगड/जाहिरात/२७४/४४४/२०२२

ग्रामपंचायत शिरवली

ता.पनवेल, जि.रायगड

जाहीर सूचना

दि.१८/०३/२०२२

ग्रामपंचायत शिरवली, ता.पनवेल, जि.रायगड १५ वा वित्त आयोगातून साहित्यांच्या व विविध विकास कामाच्या अंमलबजावणीकरिता सिलबंद निविदा मागवित आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	तरतूद रक्कम	इसारा रक्कम (नापरतावा रक्कम)	निविदा रक्कम	निविदा स्वीकारण्याची तारीख	निविदा उघडण्याचा दिनांक	काम पूर्ण करण्याचा कालावधी
१	महोदर वस्ती ठाकूरवाडी येथील तुकाराम तांबडे व चंद्रकांत भगत घरापर्यंत रस्ता करणे	२७५३४५	२७५३	१००	१९/०३/२०२२ ते २८/३/२०२२	२९/०३/२०२२	
२	वांगणी त.त.येथील साईबाबा मंरि ते बबन भगत घरापर्यंत अंतर्गत रस्ता करणे	१५००००	१५००	१००	१९/०३/२०२२ ते २८/३/२०२२	२९/०३/२०२२	
३	कोंडप येथे अंतर्गत सिमेंट रस्ता करणे	१५००००	१५००	१००	१९/०३/२०२२ ते २८/३/२०२२	२९/०३/२०२२	
४	पाले ठाकूरवाडी येथील शनिवार कांबडी ते गोमा बांगारी अंतर्गत गटारे करणे	२४५३८३	२४५४	१००	१९/०३/२०२२ ते २८/३/२०२२	२९/०३/२०२२	
५	महोदर ठाकूरवाडी येथील समाजमंदिर ते काशिनाथ पारधी घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे	१५००००	१५००	१००	१९/०३/२०२२ ते २८/३/२०२२	२९/०३/२०२२	
६	सत्याची वाडी येथील शांताराम पारधी ते अंबो भगत घरापर्यंत अंतर्गत सिमेंट रस्ता करणे	१५००००	१५००	१००	१९/०३/२०२२ ते २८/३/२०२२	२९/०३/२०२२	
७	शिरवली येथील किराणा दुकान ते गणाबुवा पाटील रस्ता काँक्रीटीकरण करणे	२५८४४२	२५८४	१००	१९/०३/२०२२ ते २८/३/२०२२	२९/०३/२०२२	
८	मुलामुलींचे समप्रमाणे राखण्यासाठी प्रचार प्रसिद्धी व साहित्य वाटप करणे	कोटेशन	-	१००	१९/०३/२०२२ ते २८/३/२०२२	२९/०३/२०२२	
९	ग्रामपंचायत हद्दीतील आदिवासी १० वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना ई-लर्निंग साहित्य पुरविणे	कोटेशन	-	१००	१९/०३/२०२२ ते २८/३/२०२२	२९/०३/२०२२	
१०	ग्रा.पं.हद्दीतील अंगणवाड्यांना गॅस कनेक्शन साहित्य देणे	कोटेशन	-	१००	१९/०३/२०२२ ते २८/३/२०२२	२९/०३/२०२२	
११	चिंचवली शाळा वॉल कंपाऊंड करणे	५००००	५००	१००	१९/०३/२०२२ ते २८/३/२०२२	२९/०३/२०२२	
१२	कोविड १९ प्रतिबंधात्मक उपाय योजना व व साहित्य खरेदी करणे	कोटेशन	-	१००	१९/०३/२०२२ ते २८/३/२०२२	२९/०३/२०२२	
१३	घन कचरा व्यवस्थापन करणे	कोटेशन	-	१००	१९/०३/२०२२ ते २८/३/२०२२	२९/०३/२०२२	
१४	ग्रा.पं.राजिप शाळांना साहित्य पुरविणे	कोटेशन	-	१००	१९/०३/२०२२ ते २८/३/२०२२	२९/०३/२०२२	
१५	अंगणवाड्यांना साहित्य पुरविणे	कोटेशन	-	१००	१९/०३/२०२२ ते २८/३/२०२२	२९/०३/२०२२	
१६	शिरवली शाळा येथे साहित्य पुरविणे व ध्वजस्तंभ बांधणे	कोटेशन	-	१००	१९/०३/२०२२ ते २८/३/२०२२	२९/०३/२०२२	
१७	पाणी शुद्धीकरणे औषध व साहित्य खरेदी करणे	कोटेशन	-	१००	१९/०३/२०२२ ते २८/३/२०२२	२९/०३/२०२२	

अटी व शर्ती :-

१) निविदा मिळणेकरिता दि.१९/०३/२०२२ ते २८/०३/२०२२ रोजी दुपारी ठिक ५.०० वाजेपर्यंत लेखी अर्ज सादर करणे
२) भरलेल्या सिलबंद निविदा दि.२८/०३/२०२२ रोजी कार्यालयीन वेळेत संध्याकाळी पाच वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.
३) आलेल्या निविदा दि.२९/०३/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील.
४) मंजूर ठेकेदारास इसारा रक्कम परत केली जाणार नाही.
५) निविदा पोस्टाने दि.२८/०३/२०२२ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयामध्ये पोहचतील त्यांचा विचार करण्यात येईल व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.
६) सदर जाहिरातीमधील मागविण्यात आलेल्या साहित्याचे, दुरुस्तीचे, उपसणे यांचे कोटेशन हे वर्षभरासाठी असेल.
७) अधिकृत ठेकेदारांनी निविदा न भरल्यास अनुभवी ठेकेदारांचा विचार केला जाईल.
८) कामाच्या बिलातून ५% सुरक्षा अनामत बिलातून केली जाईल व नियमाप्रमाणे जीएसटी, टॅक्स व इतर करकपात करण्यात येतील.
९) वर्क ऑर्डरप्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास दुसऱ्या ठेकेदारांकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास तसेच कायदशीर कारवाईस जबाबदार रहावे लागेल.
१०) उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील.
११) निविदा मंजूर केल्यास ४ दिवसांत काम सुरू करणे बंधनकारक आहे.
१२) मंजूर काम पनवेल विग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार व पंचायत देखरेखीखाली करायचे आहे.
१३) निविदा मंजूर केल्यावर रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर दोन्ही जामीनदार देवून करारनामा स्वखर्चाने करून घ्यावा लागेल.
१४) सुरक्षा अनामत रक्कम अंतिम बिलाचे ६ महिने पर्यंत ग्रामपंचायतीकडे जमा राहील, वस्तूचा / कामाचा दर्जा चांगले असल्याची ग्रामपंचायतीची खात्री झाल्यावर मागणीनुसार सुरक्षा अनामत परत केली जाईल.
१५) काम पूर्ण करणे पुर्वीच्या कामाचे ठिकाणाचे फोटो व काम चालू असतानाचे फोटो आणि काम पूर्ण झाल्यावर कामाचे फोटो दिल्याशिवाय अंतिम बिले दिली जाणार नाहीत.
१६) सोबत जोडलेल्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्तीप्रमाणे काम करण्याचे आहे.
१७) निविदा धारकाकडे पॅनकार्ड असणे आवश्यक आहे.
१८) अंदाजपत्रकीय दरापेक्षा दाराची निविदा अस्वीकृत राहील.
१९) मंजूर काम अंदाजपत्रकाप्रमाणे करणेत यावे कोणाचेही तोंडी सांगण्यावरुन वाढीव काम केल्यास वाढीव रक्कम दिली जाणार नाही.
२०) कमीत कमी दराची निविदा मंजूर करण्याबाबत विचार करण्यात येईल.
२१) एक किंवा सर्व निविदा नामंजूर करणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

सही/-
ग्रामसेवक
ग्रामपंचायत शिवली, ता.पनवेल, जि.रायगड

सही/-
सरपंच
ग्रामपंचायत शिवली, ता.पनवेल, जि.रायगड

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

संक्षिप्त...

पतीने केला पत्नीच्या हत्येचा प्रयत्न गुन्हा दाखल

दै.रायगड नगरी । पनवेल

लॅपटॉप खराब केला या गोष्टीचा राग मनात धरून पत्नीला लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी पती विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ओम साईधाम सोसायटी, डेरवली येथील मनिषा विशाल म्हात्रे यांचे २०१६ मध्ये विशाल म्हात्रे यांच्याशी प्रेमविवाह झाला. १४ मार्च रोजी त्यांनी पत्नीला फोन वरून शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर विशाल म्हात्रे यांनी त्याचा लॅपटॉप खराब केला या गोष्टीचा राग मनात धरून पत्नी मनीषा म्हात्रे यांना शिवीगाळ व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर घरातील एलजी स्पीकरचा लोखंडी स्टॅन्डचा रॉड काढून पत्नीच्या डोक्यामध्ये मारला. यात मनीषा म्हात्रे ह्या गंभीर जखमी झाल्याने त्यांच्यावर शिफा हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत.

डोक्यावर सळईने मारून केले जखमी

दै.रायगड नगरी । पनवेल

लेबर कॉन्ट्रॅक्टर गावाहून आले की तुमचा पगार करतील या गोष्टीचा राग आल्याने मिस्त्री काम करणाऱ्या नितीन शाहू यास सळईसारख्या वस्तूने मारून दोघाजणांनी जखमी केले आहे. कृष्णा पाईक आणि जरुल याच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात हत्येचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला.

नितीन थय्या शाहू हा वाकडी येथे मिस्त्री काम करतो. त्याचा मामा किशोर साहू बांधकाम व्यवसायिक आहे. १४ मार्च रोजी त्यांचा मामा लेबर कॉन्ट्रॅक्टर याच्या सांगण्यावरून अठरा लेबर लोकांचा पगार केला. यावेळेस सिमेंट उद्या येणार आहे, तुम्ही उद्या कामावर या असे त्यांनी सांगितले. त्यावेळी कृष्णा पाईक आणि जरूल यांनी पगार वेळेवर देत नाही तर कामावर येणार नाही असे सांगितले. त्यानंतर त्यांचा मामा कॉंट्रॅक्टर किशोर शाहू हा गावाहून आला की पगार करतील असे सांगितल्याने याचा राग कृष्णा पाईक आणि जरूल याला आला. आणि त्यांनी नितीन शाहू याला हाताबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली.

त्यानंतर अंधारात डोक्यावर सळईसारख्या वस्तूने मारले. त्यानंतर कृष्ण पाईक व जरूल हे पळून गेले. नितीन शाहू याच्यावर एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथे उपचार सुरू आहेत.

वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

म्हसळा तालुक्यात सर्वत्र होळी आनंदात आणि उत्साहात संपन्न

दै.रायगड नगरी । म्हसळा

म्हसळा तालुक्यात सर्वत्र होळी, धुलिवंदन मोठया उत्साहात आणि आनंदात संपन्न झाला. कोरोना मुळे गेल्या दोन वर्षात होळीच्या आनंदावर विरजण पडले होते. मात्र या वर्षी गावोगावी मनसोक्तपणे होळीचा आनंद लुटताना पाहावयास मिळाली.होळी शिमग्यात बोरकी नाचाची परंपरा आजही वंदनीय आहे.

होळी (शिमगा) म्हणजे कोकणवासीयांचा हौसैमौजेचा सण याच काळात सर्वच लोक आपल्या मुक्कामी येऊन होळी ची परंपरा राखत गावोगावी आपल्या देवाची पालखी, नाच, थेर बोरकी,नकवा, कृष्णाराधेचा असे विविध नाच आपल्या गावातील लोक एकत्र घेऊन नाचत असतात आपल्याला असणारा देवासंदर्भात भाव गीतामधून व्यक्त करून शिमगा सणाचा आनंद साजरा करतात . सध्या वस्तु स्थिती मात्र वेगळी आहे .पूर्वीचा शिमगा आणि आताचा शिमगा या मध्ये मात्र वेगळा स्वानुभाव निर्माण झाला आहे .आताचे तरुण केवळ आपल्या मोबाईल मध्ये व्यस्त असल्याने होळी शिमगा सणाकडे विशेष लक्ष देत नसल्याचे दिसत आहे . असे जरी असले तरी म्हसळा तालुक्यात मात्र होळी शिमगा सणाची परंपरा राखण्याचे कार्य म्हसळा तालुक्यातील केलटे, जांभूळ, नेवरूळ, घूम, मजगाव, पाष्टी, घोणशे, सखलप, मेंदडी, दुर्गवाडी, अश्या अनेक गावातील खेळी येऊन सनांची वातावरण निर्मिती आणि लोकांचे मनोरंजन करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. अनेक शतके सुरु असणारा थेर बोरकी नाचाची खेळी आज लहान चुमुकळी करत आहेत विविध भूमिकेत लाल वस्त्राचे परिधान करून गावोगावी जाऊन रामायन गीताची उभारणी करून राम सिताचे गुण गांन गाईले जातात . घरातील बहीण भाऊ यांची नावाजणी (नावावरती जन्मा पासून सासरी अशी येवढ्या काळावधीत आपला पाठीराखा भाऊ आपली सेवा कशी करतो माहेरच्या घरात जन्माला आल्या पासून आपल्या सासरच्या घरात राहण्याचा अवधी असे पर्यत कशी जगते याचा संपूर्ण दर्शन त्या गीतातून केला जातो) हि थेर बोरकीची परंपरा आज पाहता कमी होत चालली आहे ही परंपरा सुरु राखण्याचे काम आज काहि भाविक करत आहे .जे खेळी गेले असतात ते होम लावण्याच्या आदल्या रात्री आपल्या गावी येतात . होळी सण हा.फाल्गुन महिन्यात येणारा शिमगा उत्सव शेतकरी वर्गाच्या निवांत काळात येतो.शेतीची कामे संपलेली असतात. शेतीची भाजवणी करून ठेवलेली असते.आता पेरणीच्या काळापर्यंत म्हणजे ६ ते ७ जून पर्यंत (रोहिणी नक्षत्र) विश्रांतीचा काळ असतो. त्यामुळे हा काळ कोकणात विशेष आनंदात शिमगा उत्सव साजरा करण्यासाठी वापरला जातो. कोकणात विशेषतः रायगड रत्नागिरी जिल्ह्यात शिमगा हा सण अधिक मोठ्या प्रमाणात साजरा होतो. तिथे हा सण सुमारे ५ ते १५ दिवस असतो. प्रथेप्रमाणे फाल्गुन पौर्णिमेला होळीचा मुख्य दिवस असतो.कोकणात काही ठिकाणी पौर्णिमेच्या रात्री होम केला जातो तर काही ठिकाणी पौर्णिमायुक्त प्रतिपदेला होम केला जातो याला 'भद्रेचा होम ' असे म्हणतात. फाल्गुन शुक्ल पंचमीला काही ठिकाणी छोटी होळी लावतात आणि नंतर पालख्या पुढचे काही दिवस गावात फिरतात. काही ठिकाणी आधी पालख्या,खेळ,तमाशा फिरतात आणि पौर्णिमेला प्रत्यक्ष होळी साजरी होते. याला 'होम' लागणे असा शब्दप्रयोग वापरतात. काही गावात होम झाल्यानंतरही गावात पालख्या फीरत राहतात अशी प्रथा दिसते. पौर्णिमेला रात्री उशिरा होम लावला जातो. काही ठिकाणी त्यावर जिवंत कोंबडे लावले जाते. अशा वेळी तो होम रात्री बारापूर्वी लावतात. या कोंबड्याचा प्रसाद घरी नेवून त्याचा प्रसाद घेतात, याला तिखटाचा सण म्हणतात. काही ठिकाणी रात्री बारा ते पहाते पाच या वेळात होम लावतात, यामध्ये पुरणपोळीचा नैवेद्य दाखवतात , याला गोडाचा सण असे म्हटले जाते. ग्रामदेवतेच्या मुख्य मंदिरासमोर पहिला होम लावायचा मान असतो. हा होम झाल्यावर त्यातील निखारा किंवा राख घेऊन जातात व त्यावर गा–वातील ठिकठिकाणी होळी प्रज्वलित केली जाते. अशा विविध रूपाने सर्वच ठिकाणी होळी शिमगा सण साजरा करून आपली भारतीय संस्कृती आजही अबादित ठेवली आहे.

चिरनेरच्या वणव्यात मोठ्या प्रमाणावर वनसंपदा, वन्यजीवांची हानी १० तासांच्या अथक प्रयत्नानंतर आग आटोक्यात

दै.रायगड नगरी । उरण

चिरनेरच्या बापूजी देव डोंगर परिसरात मंगळवारी दुपारच्या रणरणत्या उन्हात लागलेल्या आगीत लाखो वन्यजीवांची हानी झाली. तर अनेक सरपटणारे प्राणी ,पक्षी त्यांची घरटी ,घरट्यातली अंडी ,पिल्लं वाचवण्यात वन्यजीव निसर्ग संरक्षण संस्थेच्या सदस्यांना यश आले आहे.दुपारच्या दोन वाजताच्या सुमारास लागलेली आग वनविभागाच्या कर्मचाऱ्यांच्या मदतीने वन्यजीव निसर्ग संरक्षण संस्थेच्या सदस्यांनी दहा तासांच्या अथक प्रयत्नानंतर मंगळवारी रात्री उशिरापर्यंत आटोक्यात आणण्यात यश आले.

उरण परिसरातील विविध डोंगरात काही समाजकंटकांकडून जाणीवपूर्वक आगी लावण्याचे आणि उन्हाचा पारा चढल्याने वणवे लागण्याच्या प्रकारात वाढ झाली आहे.काल दुपारच्या सुमारास चिरनेर बापूजी देव परिसरातील डोंगरात समाजकंटकांनी अथवा उन्हाचा पारा चढल्याने आग लागली.रणरणत्या उन्हाच्या तडाख्याने आग चांगलीच भडकली.या भडकलेल्या वणव्यात लाखो वन्यजीवांची हानी झालीआहे.

वणव्यात वन्यजीवांची आणखी होणारी हानी टाळण्यासाठी आणि अनेक सरपटणारे प्राणी ,पक्षी त्यांची घरटी ,घरट्यातली अंडी ,पिल्लं वाचवण्यासाठी वनविभागाच्या कर्मचाऱ्यांच्या साथीने चिरनेर येथील वन्यजीव निसर्ग संरक्षण संस्थेच्या काही सदस्यांनी पेटत्या डोंगराकडे धाव घेतली.आधीच मागील दोन दिवसांपासून उन्हाचा पारा ३८ सेल्सिअस पर्यंत पोहचला होता.या वाढत्या तापमानात सामोरे जाणे म्हणजे एकप्रकारचे दिव्यच होते. मात्र या आगीत मोठ्या प्रमाणावर होणारी वनसंपदा, वन्यजीवांची हानी नजरेआड करता येत नव्हती.

त्यामुळे जंगलातील सरपटणारे प्राणी ,पक्षी त्यांची घरटी , घरट्यातली अंडी ,पिल्लं यांना वाचवण्यासाठी वन कर्मचारी इंगोळे, पवार,श्रीमती शीतल आणि वन्य जीव निसर्ग संरक्षण संस्थेचे अध्यक्ष विवेक केणी, सदस्य काशिनाथ खारपाटील ,महेश् भोईर,मनोहर फुंडेकर,महेश मिरगे,रायगड भूषण राजेश पाटील आदींनी भडकलेला वणवा विझविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले.

रणरणते ऊन, चढलेला पारा आणखी त्यात वणव्यातील आगीची पर्वा न करता झाडांच्या फांद्यांनी आग विझविण्याचे केलेल प्रयत्न कामी आलेआहेत.या प्रयत्नांत जंगलातील अनेक सरपटणारे प्राणी ,पक्षी त्यांची घरटी , घरट्यातली अंडी , पिल्लांना वाचवण्यातही यश आले.मंगळवारी दुपारी लागलेला वणवा तब्बल १० तासांच्या अथक प्रयत्नानंतर आटोक्यात आल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष विवेक केणी यांनी दिली आहे.

शिवजयंती निमित्त मनसे तर्फे महाआरोग्य तपासणी, रक्तदान शिबिराचे आयोजन

दै.रायगड नगरी । पनवेल

महाराष्ट्र नवनिर्माण सेना, सानपाडा विभाग तसेच डॉ. आर. एन.पाटील सुरज हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने शिवजयंती उत्सवानिमित्त महाआरोग्य तपासणी तसेच रक्तदान शिबिराचे सोमवार, २१ मार्च रोजी आयोजन करण्यात आले आहे. सानपाडा सेक्टर ८ केमिस्ट भवन येथे सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत हे शिबिर भरविण्यात आले असून या शिबिराचे आयोजन मनसे सानपाडा प्रभाग क्रमांक ३० चे विभाग अध्यक्ष योगेश शेटे आणि प्रभाग क्रमांक २९ चे विभाग अध्यक्ष युवराज मनसुख यांनी केले आहे. महाआरोग्य तपासणी शिबिरात मेंदूचे आजार, मणक्याचे आजार, मानसिक विकार, हृदयविकार, ऑर्थो पेडिक, ऑडियोमेट्री, ब्लड प्रेशर, शुगर यांसारख्या आजारांवर मोफत उपचार करण्यात येणार आहे. तसेच शिबिरात सहभागी होणाऱ्या रुग्णांना मोफत औषधे वाटप देखील करण्यात येणार आहे. या शिबिरात गजानन काळे (शहर अध्यक्ष – मनसे, नवी मुंबई) , डॉ.आर.एन.पाटील (मेंदू विकार सर्जन), डॉ.उदय पाटील (हृदय विकार तज्ञ) आणि डॉ.रमा पाटील (मेंदू विकार तज्ञ) हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. या शिबिरात सहभागी होणाऱ्या रुग्णांना भविष्यात उपचारासाठी सुरज हॉस्पिटल, सानपाडा येथे ओपीडी २५ %, लॅब २५ % आणि आयपीडी १५ % सवलत देण्यात येणार आहे.

Sonawane Saheb Court
Adv. Vilas Patil

PUBLIC NOTICE

IN THE COURT OF HON'BLE CIVIL JUDGE
SENIOR DIVISION PANVEL, AT PANVEL
Civil M.A. No.394 Of 2022
Exhibit No.8/D
Next Date : 09/06/2022

1) Mrs.Uma Surja bahadur Thapa
Age : 63 years, Occupation : House Wife
2) Mr.Bhaskar Surja bahadur Thapa
Age : 40 years, Occupation : Service
3) Mrs.Arti Surja bahadur Thapa Alias
Mrs.Arti Sunil Shah
Age : 38 Years, Occupation : House Wife
Applicant No.1 to 3
Add : Khandeshwar, 101, Park Heaven
Building, Plot No.205/206, Sector 21,
Kamothe, Tal-Panvel, Dist-Raigad Applicant
V/S
Nil Responded

All the public do hereby inform by this paper notice the applicant no.1 to 3 have filed this heirship Applicants before Civil Judge Senior Division Panvel for declaring that application is legal heirs of deceased Late.Surja bahadur Jaguram Thapa.

Late.Surja bahadur Jaguram Thapa. died on dt. 06/07/2018 at : New millennium Hospital, kamothe, Tal-Panvel, Raigad, the discerption of the property is as follows :-

Description of Property
Flat No.101, 1 st floor "PARK HEVEN" Building,
Plot No.205/206, Sector No.21, Village-Kamothe
Tal-Panvel, Dist-Raigad.
Carpet Area of 36.26 sq.mtr.(Built up area 43.51 sq.mtr)
Chargable loft area/open terrace having carpet area
4.49 sq.mtrs. (Built up area 5.38 sq.mtr)

The above mentioned property registered Agreement for sale dt.08 July 2009. The siad Agreement is registered at office of sub registrar-1 Panvel, Raigad at serial no.4054/2009.

That application have filed application or grant of heirship certificate about above mentioned property that application is the legal heir of deceased Surja bahadur jaguram Thapa before this Hon'ble court. Other than application there are no legal heirs left by the said deceased. If any perosn having any bojection regarding this application kindly raise their objection before this Hon'ble court after publication ot this notice within 30 days. After expiration of time no objection will be considered.

Dt.17 This March day 2022

Sd/-
Juniour typist
C.J.S.D.Panvel

Court Seal

Sd/-
Assit.Superintend
C.J.S.D.Panvel

अर्जदारांकरिता ॲडव्होकेट ॲड.उदय प्र.मोकल

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब व.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.१७४३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.३०/०४/२०२२

(कै.शिवराम सिताराम गमरे यांचे कायदेशीर वारस)
१) श्री.विक्रम शिवराम गमरे (मुलगा)
वय : ३६ वर्षे, धंदा : नोकरी
२) श्री.प्रशांत शिवराम गमरे (मुलगा)
वय : २७ वर्षे, धंदा : नोकरी
३) श्रीमती.सुनिता शिवराम गमरे (पत्नी)
वय : ६१ वर्षे, धंदा : गृहिणी
आधार कार्ड नं.६०३१६१५१८३३९
अर्जदार १ ते ३ राहणार
रा.फ्लॅट नं.४०३, बी विंग, प्लॉट नं.५१,
सेक्टर नं.०९, सातारा सहकारी बँके जवळ,
कल्पतरु कॉम्प्लेक्स, खांदा कॉलनी,
पनवेल (पश्चिम), पिन कोड–४१०२०६
४) सौ.दक्षता विनोद कासारे (मुलगी)
वय : ३२ वर्षे, धंदा : नोकरी
रा.फ्लॅट नं.०००३/अे, सिल्व्हर शॉवर,
लेक गार्डन कॉम्प्लेक्स, पापडी वसई,
पिन कोड–४०१२०७ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदारांचे म्हणणे असे आहे की, कै.शिवराम सिताराम गमरे यांचे निधन दि.३०/०१/२०२१ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर हॉस्पिटल, मुंबई येथे झालेले आहे.

कै.शिवराम सिताराम गमरे यांच्या मृत्यू पश्चात वरील पैकी अर्जदार हे कै. शिवराम सिताराम गमरे कायदेशीर वारस आहेत.

अर्जदारांचे म्हणणे असे आहे की, कै.शिवराम सिताराम गमरे यांनी मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनित निवासी सदनिका खरेदी केलेली आहे.

मालमत्तेचे वर्णन
मौजे : पनवेल (नवी मुंबई), ता.पनवेल,
जि.रायगड येथील निवासी सदनिका
सदनिका क्रं.४०३
विंग–बी
चौथा मजला
कल्पतरु कॉम्प्लेक्स
प्लॉट नं.५१,
सेक्टर ०९
क्षेत्रफळ : २३०.०० चौरस फुट

सदर वरील वर्णनित स्थावर मिळकतीचे वारस दाखला मिळणेकरिता वरील अर्जदार यांनी मे.दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर पनवेल यांचे कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही हक्क, अधिकार, हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटी प्रसिद्ध झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होवून लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे.कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरील प्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेवून मे.कोर्टात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दि.१४/०३/२०२१

सही/–
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/–
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

मा.मुजावर साहेब कोर्ट
अर्जदार यांचे वकील
ॲड.अर्चना म्हस्कर

जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.दिवाणी न्यायाधिश साहेब (व.स्तर) यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज नं.३२४/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२०/०४/२०२२

१) श्रीमती.ताराबाई महादेव गायकर
उ.व.७६, धंदा : गृहिणी
२) श्री.सुनील महादेव गायकर (मयत) तर्फे वारस
२/१) श्रीमती.शकुंतला सुनील गायकर
उ.व.५२, धंदा : गृहिणी
२/२) श्री.आशिष सुनील गायकर
उ.व.३२, धंदा : नोकरी
२/३) श्रीमती.नमिता सुनील गायकर
उ.व. , धंदा : गृहिणी
२/४) श्रीमती.अंकिता सुनील गायकर
उ.व.३२, धंदा : गृहिणी
३) श्री.प्रभाकर महादेव गायकर
उ.व.४७, धंदा : व्यवसाय
४) श्री.दिनेश महादेव गायकर
उ.व.४५, धंदा : व्यवसाय
वरील सर्व रा.घर नं.४७२, विठाबाई निवास,
हनुमान मंदिराजवळ, कामोठे गाव,
सेक्टर १४, कामोठे, पनवेल, रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, कै.महादेव शंकर गायकर यांचे दिनांक २०/०७/२०२० रोजी कामोठे येथे निधन झाले आहे. यांचे मालकीचे व ताबेकब्जातील मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती संदर्भात वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज दाखल केलेला आहे. सदर मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणेः–

मिळकतीचे वर्णन

कोष्टक (अ)
मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड

अ.क्र.	गावाचे नाव	यु.के.नं.	स.नं.	हि.नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.
१	कामोठे	३५४	३५	१	०–३०–०३
			३१	२	०–३०–०१
			३४	१	०–९३–७
			६७	२	०–११–००
२	कामोठे	४१६/३	३४९	१	०–१६–०२
		४	३४९	३	०–१८–०७
			३४९	१२	०–३४–००
३	पनवेल	४६३	६३२	३	०–४८–०६

येणेप्रमाणे मिळकतीचे वर्णन

वर वर्णन करण्यात आलेली मिळकत ही कै.महादेव शंकर गायकर यांचे मालकीची व ताबेकब्जातील आहेत. कै.महादेव शंकर गायकर यांचे नावे असलेली मिळकत ही अर्जदार क्रं.१ ते ४ यांचे नावे होण्यासाठी अर्जदार क्रं.१ ते ४ यांनी वारस दाखला मिळणेकरिता या मे.कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. कै.महादेव शंकर गायकर यांना अर्जदार क्रं.१ ते ४ हेच सदर मिळकती संदर्भात कायदेशीर वारस आहेत. त्यांचे या हक्काबाबत कोणाही व्यक्तीस काही हरकत, आक्षेप असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या मा.न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहून, आपल्या हरकती व आक्षेप दाखल कराव्यात. याप्रमाणे दिलेल्या कालावधीमध्ये योग्यरितीने हरकती न घेतल्यास हे मा.न्यायालय अर्जदार १) श्रीमती.ताराबाई महादेव गायकर २) श्रीमती.शकुंतला सुनील गायकर २/१) श्री.आशिष सुनील गायकर २/२) श्रीमती.नमिता सुनील गायकर २/३) श्रीमती.अंकिता सुनील गायकर ३) श्री.प्रभाकर महादेव गायकर, ४) श्री.दिनेश महादेव गायकर हे कै.महादेव शंकर गायकर यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचा दाखला सदर मिळकती संदर्भात देईल, याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१७/०३/२०२२ माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/–
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/–
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

ॲड.अरविंद एम. चामले
ॲड.शुभांगी पाटील

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो.पनवेल यांचे न्यायालयात
चौ.अर्ज नं.३४८/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१८/०४/२०२२

१) श्रीमती.सुवर्णा जनार्दन जितेकर
वय : ६१ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्रीमती.कांचन सुनील म्हात्रे
(पुर्वाश्रमीची कांचन जनार्दन जितेकर)
वय : ४५ वर्षे, धंदा : गृहिणी
३) श्री.सुरेंद्र जनार्दन जितेकर
वय : ४१ वर्षे, धंदा : शेती
४) श्रीमती.कुंदा जनार्दन जितेकर
वय : ५२ वर्षे, धंदा : शेती
५) श्री.जितेंद्र जनार्दन जितेकर
वय : ३८ वर्षे, धंदा : शेती
६) श्री.ज्वाला जनार्दन जितेकर
वय : ३७ वर्षे, धंदा : शेती
रा.पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

सदर जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, प्रस्तुत अर्जदार यांनी मे.कोर्टात चौकशी अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जदार क्र.१ यांचे पती व २ ते ६ यांचे वडील कै.जनार्दन गंगाराम जितेकर हे दि.१४/११/२०२१ रोजी मु.पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू पावले असून ते येथील कायमचे रहिवासी होते. त्यांचे मृत्यूसमयी त्यांचे नावावर खालीलप्रमाणे मिळकत होती व तिचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे.

मिळकतीचे वर्णन
१) मौजे : दापोली, ता.पनवेल, जि.रायगड

अ.क्र.	सर्व्हे नं./हिस्सा नं.	क्षेत्र
१	१५८/४	०–३७–००

सदर मिळकत सिडकोकडे संपादीत झाली असून त्याच्या बदल्यात मिळालेला प्लॉट २२.५ टक्के योजनेंतर्गत पुष्पकनगर दापोली सेक्टर नं.३, ता.पनवेल, जि.रायगड येथील क्षेत्र ५९० चौ.मी., भूखंड क्र.एफ–१० (२३५) पैकी जनार्दन गंगाराम जितेकर यांचा अविभाज्य हिस्सा

मिळकतीचे वर्णन
२) मौजे : पारगांव, ता.पनवेल, जि.रायगड

अ.क्र.	सर्व्हे नं./हिस्सा नं.	क्षेत्र
१	१/१ बी	०–६२–००
२	१/३ अ	०–०९–२०

सदर मिळकत सिडकोकडे संपादीत झाली असून त्याच्या बदल्यात मिळालेला प्लॉट २२.५ टक्के योजनेंतर्गत पुष्पकनगर दापोली सेक्टर नं.३, ता.पनवेल, जि.रायगड येथील क्षेत्र ११४० चौ.मी. भूखंड क्र.२८३–आय ४ पैकी जनार्दन गंगाराम जितेकर यांचा अविभाज्य हिस्सा

मयत कै.जनार्दन गंगाराम जितेकर यांचे कायदेशीर वारसदार पुढीलप्रमाणे आहेत.

अ.क्र.	वारसदाराचे नांव	वय	मयताशी नाते
१	श्रीमती.सुवर्णा जनार्दन जितेकर	६१	पत्नी
२	सौ.कांचन सुनील म्हात्रे	४५	मुलगी
३	श्री.सुरेंद्र जनार्दन जितेकर	४१	मुलगा
४	श्रीमती.कुंदा जनार्दन जितेकर	५२	मुलगी
५	श्री.जितेंद्र जनार्दन जितेकर	३८	मुलगा
६	श्री.ज्वाला जनार्दन जितेकर	३७	मुलगा

वरील प्रमाणे मयत कै.जनार्दन गंगाराम जितेकर यांचे कायदेशीर वारसदार आहेत व यांचे शिवाय इतर कोणीही वारसदार नाहीत व नव्हते. प्रस्तुत चौकशी अर्ज हेअरशिप ठरवून मिळण्यासाठी मे.कोर्टात दाखल केला आहे. तरी या संदर्भात वारसा संबंधी कोणत्याही प्रकारची तक्रार हरकत वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी. वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबाबत लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक : १७/०३/२०२२
ठिकाण : पनवेल

सही/–
क.लिपीक
दि.न्या.क.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/–
सहा.अधिक्षक
दि.न्या.क.स्तर, पनवेल

कर्जत तालुक्यात वणव्यांची मालिका पुन्हा सुरू

दै.रायगड नगरी । कर्जत

नेमीची येतो पावसाळा याप्रमाणे फेब्रुवारी मार्च नंतर कर्जत तालुक्याच्या विविध भागात सातत्याने वणवे लागतात.गेली अनेक वर्षे वणवे लागण्याचे किंवा लावण्याचे प्रकार सातत्याने सुरू आहेत. तालुक्यात वणव्यांची मालिका पुन्हा सुरूच आहे.

झाडे लावा झाडे जगवा चा नारा देत काही सामाजिक संस्था आणि निसर्गप्रेमी नागरिक पावसाळ्यात स्वखर्चाने वृक्षारोपण करतात. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने सुद्धा रस्त्यांच्या कडेला हजारो झाडे लावली जातात. प्रत्येक सदस्याला काही झाडे लावून ती जगवण्याची जबाबदारी दिली जाते. त्याप्रमाणे त्यांना कुंपण करून रोज पाणी देण्याचे काम हे सदस्य करतात.

शासनाच्या सामाजिक वनीकरण विभागा मार्फत सुद्धा हजारो झाडे लावण्यात येतात. पण कोणीतरी माथेफिरू माचीस ची एक काडी पेटवून शेकडो एकर ची वनसंपदा नष्ट करतो. तालुक्याच्या प्रत्येक भागात असा एकेक माथेफिरू असावा हे मनाला पटत नाही. त्यामुळे या आगी लागतात की लावल्या जातात याची उच्चस्तरीय चौकशी होणे गरजेचे आहे. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते उदय पाटील यांनी केली आहे. आगी लावणारे खूप मोठे रॅकेट असावे आणि यामागे मोठ्या प्रमाणात आर्थिक अफरातफर होत असावी हे उघड सत्य नाकारण्यात अर्थ नाही. शासनाच्या वनविभागाला इतक्या वर्षात आग लावणारा एकही आरोपी पकडता आला नाही यावर विश्वास बसत नाही. एखाद्या गरीबाच्या झोपडी साठी एखादा वासा आणला तरी वनविभागाची धाड पडते. इतके त्यांचे गुप्तहेर खाते मजबूत आहे. असे असताना हजारो एकरची वने जाळली जात असताना वनखाते शांत का बसते याचा शोध घ्यायलाच पाहिजे असे मत उदय पाटील यांनी व्यक्त केले आहे.

माथेरान मध्ये होळी आनंदाने साजरी

दै.रायगड नगरी । माथेरान

पर्यटनस्थळ माथेरानमध्ये लॉक डाऊन मुळे कोणत्याही प्रकारचा सण साजरा करता आला नव्हता.दोन वर्षांनंतर कोरोनाच्या महामारी नंतर यावेळेस प्रथमच सण साजरे करताना नागरिकांना आनंद झाला आहे. सर्वांचाच आवडता शिमगा मोठया आनंदाने साजरा करण्यात आला येथील विविध ठिकाणी लहानमोठ्या होळ्यांची बाळगोपालांसह उभारणी करून हा सण साजरा केला.बच्चेकंपनीसह आबालवृद्ध मंडळींनी यामध्ये आपला सहभाग नोंदवला.

संक्षिप्त...

बाहे येथे शिवजयंती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

दै.रायगड नगरी । खांब-रोहा

रोहे तालुक्यातील ताज्या भाजी पाल्याच्या पिकासाठी विशेष सुप्रसिद्ध असणाऱ्या क्रुषीनिष्ठ बाहे गावातील शिवप्रेमीं गावदेवी बाहे यांच्या वतीने सालाबादप्रमाणे याही

शिवजयंती उत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून या निमित्ताने विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले असल्याची माहिती देण्यात आली आहे .

गत अनेक वर्षांची यशस्वी परंपरा राखत संपन्न होत असलेल्या या शिवजयंती उत्सव सोहळ्यानिमित्त रवि.दि.२० मार्च रोजी सायं. ४ वा.किल्ले रायगड कड़े शिवज्योत आणण्यासाठी प्रस्थान, सोम.दि.२१ मार्च रोजी पहाटे ४:००वा. (जगदीश्वर मंदिर) येथे मशाल प्रज्वलीत, एक धाव माझ्या राजासाठी किल्ले रायगड ते बाहेनगरी शिवस्मारक, स.११ वा. मशाल ज्योतीचे आगमन व शिववंदना, सायं. ७ वा छत्रपती शिवराय यांच्या जीवन चरित्रपर आधारित वत्कुत्व स्पर्धा तर रात्रौ ठिक ९ वा.स्नेहभोजन व जागर आदी कार्यक्रम संपन्न होणार असून या संपूर्ण कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी शिवप्रेमी गावदेवी बाहे येथील मंडळाचे सर्व पदाधिकारी व सदस्य मेहनत घेत आहेत.

नऊ मांजरांचा मृत्यू, तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

दै.रायगड नगरी । पनवेल

मांजरांना जाणीवपूर्वक क्रूरपणे वागणूक देऊन त्यांना आवश्यक अन्नपाण्याची व्यवस्था न केल्याने नऊ मांजरांचा मृत्यू झाल्याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शफिकुननिसा अनिस अहमद सय्यद यांनी अपना अनीमल्स शेल्टर सिद्धी करवले याठिकाणी मांजरीची तेरा पिल्ले सांभाळण्यासाठी दिली होती.दरमहा साडे तीन हजार रुपये देण्याचे त्यांचे ठरले. १४ मार्च रोजी सय्यद व राबिया मोहम्मद यांनी ऍनिमल सेल्टर, सिद्धी करवले येथे भेट दिली. यावेळी त्यांना तेरा मांजरांपैकी फक्त चार मांजरे दिसून आली.

उर्वरित मांजरांबाबत संगीताकडे चौकशी केली असता जास्त खाल्ल्याने ते आजारी पडून मयत झाले आणि गॅस्ट्रोने मेले असल्याचे सांगितले. यावेळी मांजरांच्या पिल्ल्यांच्या डेडबॉडी विषयी विचारले असता कोणताही फोटो व रेकॉर्ड दिला नाही.

त्यामुळे शेल्टरची मालकीण संगीता हिने मांजरांना जाणीवपूर्वक क्रूरपणे वागणूक देऊन त्यांना आवश्यक अन्नपाण्याची व्यवस्था केली नाही व अस्वच्छ जागेत राहण्यास भाग पाडून मांजरांच्या आरोग्याची काळजी घेतली नाही व त्यांच्या आरोग्याला धोका निर्माण केला. यात नऊ मांजरांचा मृत्यू झाला. या प्रकरणी मालकीण संगीता यांच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

बेमुदत काम बंद आंदोलनाचा इशारा

दै.रायगड नगरी । उरण

महाराष्ट्रातील नगरपालिका, नागरपंचायत व संवर्ग कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत महाराष्ट्र राज्याचे सन्माननीय मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, नगरविकास मंत्री मा.एकनाथ शिंदे , प्रधान सचिव महेश पाठक, आयुक्त तथा संचालक डॉ. किरण कुलकर्णी यांना महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायत व संवर्ग कर्मचारी संघर्ष समिती यांच्या वतीने लेखी निवेदन देण्यात आले. यापूर्वी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तसेच प्रधान सचिव यांचे सोबत झालेल्या बैठकीत मांडलेल्या निवेदनातील अनेक मुद्द्यांवर शासनाकडून समस्या सोडविण्याचे वेळोवेळी आश्विसीत केले होते, त्याची पूर्तता ना झाल्यामुळे संघर्ष समितीच्या वतीने सदरचे निवेदन देण्यात आले. यातील समस्या सोडविल्या नाहीत तर येत्या दि. १ मे २०२२ पासून बेमुदत काम बंद आंदोलन करण्यात येईल .

सदरहू निवेदनात नमूद केलेल्या मागण्या पुढीलप्रमाणे :- मासिक वेतन वेळेवर मिळावे. सफाई कामगार हा सफाई कामगार आहे स्वताचा जीव धोक्यात घालून इतरांना आरोग्यदायी जीवन देणारा कर्मचारी त्याची कोणतीही जात नाही तर सफाई कामगार हि एकच जात समजून वारसांना नोकरीचे मार्ग मोकळे करणे. सन २००५ पासून प्रलंबीत आकृती बंध तात्काळ तयार करणे बाबत आदेश निर्गमित करणे. ७ व्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम देणे. अश्वासित प्रगती योजने बाबत नगरविकास विभागाने शासन निर्णय पारीत करणे. कंत्राटी कामगारांना समान कामाला समान वेतन देणे आवश्यक आहे. सध्या ते नाही तर निदान किमान वेतन तरी मिळालाच पाहिजे. २००४ नंतर रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना जूनी पेन्शन योजना लागू करणे . या व अशा ३२ मागण्यांसाठीचे निवेदन देऊन जर या मागण्या मान्य नाही झाल्या तर दि. १ मे २०२२ पासून बेमुदत बंद पुकारला जाईल असा इशारा महाराष्ट्र राज्य नगरपरिषद नगरपंचायत कर्मचारी संवर्ग कर्मचारी संघर्ष समितीनेच्या वतीने शासनाला दिड महीने आधी इशारा दिला आहे.अशी माहिती संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सुरेश पोसतांडेल यांनी दिली आहे.

कशेडी घाटात टेम्पोची धडक;एक ठार आणि तिघे जखमी

दै.रायगड नगरी । पोलादपूर

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील कशेडी घाटात शुक्रवारी पहाटे झालेल्या एका विचित्र अपघातात चहा पिण्यासाठी थांबलेल्या गोवा येथे जाणाऱ्या प्रवाशांना संगमेश्वर येथून भरधाव वेगाने आलेल्या टेम्पोने धडक दिल्याने एकाचा मृत्यू झाला तर अन्य तिघे जखमी झाले. पोलादपूर पोलीस ठाण्यात या अपघातप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शुक्रवार, दि. १८मार्च २०२२ रोजी पहाटे वाजताचे दरम्याने ऑरा कार क्रमांक एमएच ४८बीटी १८१७ या कार मधुन जयेश रमेश राऊत,वय ३८ आणि अंजली जयेश राऊत (वय ३२) दोन्ही राहणार विरार मुंबई यांचेसह चालक विनीत मधुकर राऊळ, (वय ३७) तिघेही विरार मुंबई येथील राहणारे असून ते गोवा येथे जात असता कशेडी बंगला येथे गाडी थांबवून चालक विनीत राऊळ तसेच जयेश राऊत हे दोघे चहा पीत उभे होते. त्याचवेळी मोटार सायकल बजाज पल्सर क्रमांक एमएच ०८ टी ३६६६ वरील अशोक तुळशीराम पांगले (वय ५०) मुंबई (जखमी) आणि अशोक यशवंत राऊत (रा.कसबा ता. संगमेश्वर) हदेखील चहा पिण्याकरीता थांबले होते. त्याचवेळी मुंबई ते संगमेश्वर असा जाणारा टाटा एसी गोल्ड टेम्पो (एमएच ०८ एटी ९२११) चा चालक-महम्मद यासीन उमर फारुख पठाण ५ संगमेश्वर मापारी मोहल्ला हामोहम्मद हमाद उमर फारूक पठाण (वय-२५,रा.संगमेश्वर मापारी मोहल्ला) याचेसह मुंबई ते संगमेश्वर असा चालवत घेऊन जात असता झोप अनावर झाल्याने गाडीवरील ताबा सुटून महामार्गालगत टपरीवर चहा पीत असलेल्या लोकांना ठोकर मारून अपघात केला. अपघातात गंभीर जखमी विनीत मधुकर राऊळ (वय ३७, रा.विरार) याला जास्त गंभीर दुखापत झाल्याने उपचाराकरता नरेंद्र महाराज ट्रस्टच्या ऍम्ब्युलन्सने पोलादपूरला ग्रामीण सरकारी रुग्णालय येथे दाखल केले असता उपचारादरम्यान तो मयत झाला. जखमींवर उपचार सुरू असून काहींना किरकोळ जखमा असल्याने उपचारानंतर सोडून देण्यात आले आहे. अपघातस्थळी असलेली अपघातातील वाहने रस्त्याच्या बाजूला करण्यात आली असून वाहतूक सुरळीत चालू करण्यात आल्याची माहिती वाहतूक पोलीस उपनिरिक्षक ए.पी. चांदणे यांनी दिली.

ढवळे कुंटुब म्हसळा यांची पारंपारिक होळी

कळंबोली लोह पोलाद बाजारातीच्या इमारतीमधील गाळ्याला लागली आग

दै.रायगड नगरी । पनवेल

कळंबोली लोह पोलाद बाजाराच्या इमारतीमधील गाळ्याला शॉर्टसर्किटमुळे आग लागली. तेथील कागदपत्रे त्याचबरोबर २ संगणक, २ प्रिंटर, २ झेरॉक्स मशीन, ६ लॅपटॉप जळून खाक झाले. आग विझवण्यासाठी कळंबोली येथील अग्निशमन दलाचा बंब घटनास्थळी पोहोचला. मात्र आतमध्ये जाण्यासाठी जागा नसल्याने वेळेमध्ये आग विझवता आली नाही. अग्निशमन बंबाला वळसा घालून त्या ठिकाणी जावे लागल्याची माहिती अग्नीशमनच्या अधिकार्यांनी दिली.

कळंबोली स्टील मार्केटमधील फॅसिलिटी सेंटर समोरील रस्ता बाजार समितीने बंद केला आहे. त्यामुळे या ठिकाणी वाहनांना ये-जा करता येत नाही. मंगळवारी रात्री या ठिकाणी आग लागली असताना अग्निशमन बंब आला. येथे येण्यासाठी अनेक अडथळे पार करावे लागले. या आगीत गाळ्यामधील अनेक वस्तू जळून खाक झाल्या. लोहपोलाद बाजार कलंबोली याठिकाणी सिडकोने या ठिकाणी हा बाजार विकसित केला. आशिया खंडातील सर्वात मोठे लोहपोलाद मार्केट हे असून याठिकाणी सिडकोने फॅसिलिटी सेंटर बांधले. येथेच लोहपोलाद बाजार समितीचे कार्यालय आहे. त्याचबरोबर दोन बँका आणि पनवेल आरटीओ चे ऑफिस आहे. या सेंटरच्या समोरील रस्ता सिमेंटचे ब्लॉक लावून गेल्या कित्येक महिन्यांपासून बंद करण्यात आला आहे. कित्येक दिवस झाले तरी हा रस्ता रहदारीसाठी खुला करण्यात आला नाही. त्यामुळे अनेक गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे.

जीटीआयमधील २०० ड्राईव्हर्सची एनएमजीकेएस संघटनेत घरवापसी

दै.रायगड नगरी । उरण

काही वर्षापूर्वी व्यवस्थापनाच्या ताटाखालचे मांजर असणाऱ्या युनियनच्या भुळथापांना बळी पडून संघटना सोडून गेलेल्या सर्व कामगारांची निराशा झाल्याने पुन्हा सर्व ड्राईव्हर्सनी NMGKS संघटनेचे अध्यक्ष महेंद्र घरत यांचे नेतृत्व स्विकारले आहे.

कोविड काळात NMGKS संघटनेने केलेले काम, कामगारांना केलेली मदत तसेच कुणाच्याही स्वप्नात नसताना खढ्ऋ लंडन या आंतरराष्ट्रीय संघटनेबरोबर मागणी करून पत्रव्यवहार करून २६ हजार ते ५५ हजार कोविड भत्ता मिळवून दिला. पोर्ट मधील कायमस्वरूपी कामगार प्रमाणे कोविड मध्ये मृत्यू पावलेल्या कंत्राटी कामगाराला सुद्धा ५० लाखाची नुकसान भरपाई मिळण्यासाठी जागतिक स्तरावर मागणी केली. ड्राईव्हर्सना येण्याजाण्यासाठी सुविधा करून दिली. हे व यासारख्या अनेक जिव्हाळ्याचे प्रश्न संघटनेचे कार्याध्यक्ष पि. के. रामण यांनी सोडवून दिले. त्यामुळे कामगारांना NMGKS संघटनेबद्दल आस्था वाटून सर्व कामगार पुन्हा एकदा मेजॉरीटीने संघटनेत शामिल झाले.त्यामुळे कामगारांना आता त्यांचे सर्व हक्क व अधिकार प्राप्त होणार आहेत. संघटनेची द्वारसभा दिनांक १६ मार्च २०२२ रोजी GTI कंपनीच्या गेटवर संपन्न झाली. या द्वारसभेस संबोधित करताना संघटनेचे अध्यक्ष कामगार नेते महेंद्र घरत म्हणाले की, जागतिक पातळीवर एक हजार डॉलर म्हणजेच ७५ हजार रुपये कोविड भत्ता जाहीर झाला परंतु GTI व मर्स्क व्यवस्थापनेने त्यामध्ये कपात केली तसेच टॅक्स हि कापण्यात आला हे योग्य नाही. हि कपात केलेली रक्कम NMGKS संघटना कामगारांना मिळवून देईल तसेच या अगोदर चार संघटनेत कामगार विभागले गेले होते त्यामुळे कामगारांना सन्मानाची वागणूक मिळत नव्हती. परंतु आता सर्व कामगार एकजूट होवून NMGKS संघटनेच्या छत्रछायेखाली आले आहेत.त्यामुळे कामगारांच्या न्याय हक्कासाठी वेळ पडलीच तर GTI चा चक्काजाम करून कामगारांना आता त्यांचा पूर्वीचा सन्मान मिळवून देऊ असे ते म्हणाले. या द्वारसभेप्रसंगी संघटनेचे कार्याध्यक्ष पि. के. रामण, सरचिटणीस वैभव पाटील, उपाध्यक्ष किरीट पाटील, नवीन शेवा सरपंच आदिनाथ भोईर, संघटनेचे संघटक लंकेश ठाकूर, रविंद्र पाटील, आनंद ठाकूर, संजय म्हात्रे, महेश घरत, अनिल कुमार, कल्पेश बादल, प्रशांत पाटील, ब्रम्हदेव यादव, गलांडे, कवडे, बापू गरुड, योगेश रसाळ, प्रल्हाद पाटील, केसरीनाथ नाईक, अरुण गिरी व किरण पाटील तसेच शेकडोच्या संख्येने कामगार उपस्थित होते.

नांदगाव, मजगांव,बोर्ली-मांडला येथे होळीचा सण उत्साहात

दै.रायगड नगरी । कोर्लई

मुरुड तालुक्यातील नांदगाव मजगांव बोर्ली-मांडला येथे होळी पौर्णिमा व धुळवडीचा सण पारंपारिक पद्धतीने साधेपणाने साजरा करण्यात आला. मजगांव मधील नवापाडा कोळी समाजाच्यावतीने होळी ला आकर्षक रंग रांगोळी व विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

बोर्लीमध्ये होळी सणाला पारंपारिक इतिहास असून पुर्वी दळणवळणाची साधने नसताना गलबताद्वारे मालाची ने-आण येत होती.होळीच्या आदल्या दिवशी नौका बंदरालगत आणून त्यांची रंग रंगोटी व सजावट करुन होळीच्या दिवशी सकाळी सजविलेल्या नौका समुद्रात वाजत-गाजत फिरविल्या जातात.होळीचा सण नौकांसाठी मुख्य दिवस मानला जात असून त्यांची विधिवत पूजा अर्चा करून आभार व्यक्त करण्याची प्रथा आहे. हा सण उत्साहात साजरा करण्यात आला. आजचा होळीचा सण हा कोळी लोकांसाठी खूप महत्त्वाचा सण आहे . होळीच्या दिवशी सर्व कोळी बांधव आपल्या बोटींची विधिवत पूजा करून भरतीच्या मुहूर्तावर त्यांची वाजतगाजत समुद्रात मिरवणूक काढतात . संध्याकाळी बोटींचे नाखवा व सर्व खलाशी आपल्या कुटुंबासोबत वाजतगाजत बोटींची आरती करण्यास बंदरावर जातात , तिथे आपल्या बोटींची विधिवत आरती करून बोटीवरील लावलेला एक मनाचा झेंडा होळी मैदानात असलेल्या होळी ला फेरी मारून घरी आणला जातो ,हा झेंडा गुढीपाडव्या पर्यन्त घराच्या वर फडकत ठेवला जातो ,असा हा होळीचा सण हा कोळी लोकांसाठी होडी चा मानाचा सण असतो.

नवी मुंबईतील पत्रकारांचा किल्ले प्रतापगड अभ्यास दौरा संपन्न

दै.रायगड नगरी । नवीमुंबई

जर्नालिस्ट वेलफेअर असोसिएशन, नवी मुंबईच्यावतीने एक दिवस गड-किल्ल्यांसाठी, आपला इतिहास जोपासण्यासाठी या उपक्रमांतर्गत पत्रकारांची किल्ले भेट आणि पुरातन धार्मिक स्थळांच्या भेटीचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचे शौर्य आणि त्यांच्या पराक्रमाची यशोगाथा सांगणाऱ्या प्रतापगडाला भेट ,त्यानंतर पुरातन

श्रीक्षेत्र महाबळेश्वर , पंचगंगा देवस्थान माहिती घेत दर्शन घेतले . पाचगणी येथील भिलार गावातील देशातील पहिलं अनोख्या पुस्तकांच्या गावाला पत्रकारांनी भेट दिली. किल्ले प्रतापगडाचा पराक्रमी इतिहास, सह्याद्रीच्या डोंगररांगाची अभ्यासपूर्ण माहिती आनंद उतेकर यांनी विशद केली .

जर्नालिस्ट वेलफेअर असोसिएशनचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार अशोक शेशवरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित दोन दिवसीय अभ्यास दोऱ्यात जेष्ठ पत्रकार गुरुवर्य विश्वरथ नायर यांनी संभाषणात मार्गदर्शन करताना प्रतापगड आणि शिवकालीन इतिहास जागा केला.

सदर दोऱ्याची सुरुवात सीबीडी येथून करण्यात आली. नैना बिल्डर्स असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश बाविस्कर , माजी नगरसेवक अशोक गुरखे यांनी भगवा ध्वज फडकावत नवी मुंबईतील पत्रकारांना शुभेच्छा दिल्या . असोसिएशनच्या माध्यमातून किल्ले भेट या अस्मिता जपणाऱ्या उपयुक्त कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल अध्यक्ष अशोक शेशवरे आणि सर्व पत्रकारांचे आपल्या भाषणात कौतुक करत बाविस्कर यांनी शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना असोसिएशनचे अध्यक्ष अशोक शेशवरे म्हणाले की, गत वर्षी शिवप्रेमींचे शक्तिस्थान असणाऱ्या ऐतिहासिक किल्ले रायगडाला भेट दिली होती यावेळी किल्ले प्रतापगड भेटीचे आयोजन करण्यात आले.महाराष्ट्राच्या मातीचा कणा आणि अस्मिता असणाऱ्या शिवकालीन गड किल्ल्यांची माहिती नवोदित पत्रकारांना मिळावी, या गड-किल्ल्याच्या भेटीतून किल्ले संवर्धन करण्यासाठी पत्रकारांच्या संकल्पना शासनापर्यंत पोहोचाव्यात याकरिता अभ्यास दोऱ्याच आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. पाचगणी भिलार प्रमाणे स्वच्छ सुंदर शहर म्हणून ओळखला जाणाऱ्या नवी मुंबई शहरात नवी मुंबई महापालिकेच्या माध्यमातून प्रायोगिक तत्त्वावर पुस्तकांचे नवी मुंबई शहर निर्माण करण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे अध्यक्ष शेशवरे यांनी सांगितले. या अभ्यास दोऱ्यास महाबळेश्वर येथील प्रसिद्ध बिल्डर रमेश ढेबे ,भगवान ढेबे यांनी मोलाचे सहकार्य केले .